*मातृस्वरूप नेत्री हरपली ....सुधीर मुनगंटीवार यांची शोक संवेदना*
=============================================

भाजपच्या ज्येष्ठ नेत्या सुषमाजी स्वराज यांच्या निधनाने मातृस्वरूप नेत्री हरपल्याची शोकभावना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

उत्तम संसदपटू , अभ्यासू , वात्सल्यमूर्ती अशी सर्व विशेषणे थिटी पडावी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. आपल्या कार्यकर्त्यांवर त्या बंधुवत , पुत्रवत प्रेम करायच्या. जेव्हाही त्यांची भेट व्हायची कौतुकाने त्या पाठीवर थाप मारायच्या . त्यांच्या आभाळमायेला माझ्यासह असंख्य कार्यकर्ते आज पारखे झाले आहेत. परराष्ट्र मंत्री असताना एका ट्वीट द्वारे अवगत करण्यात आलेल्या समस्येवर त्यांनी तातडीने दखल घेत निराकरण केल्याची अनेक उदाहरणे आहेत. केंद्रीय मंत्री , मुख्यमंत्री , विरोधी पक्षनेत्या यासह अनेक संघटनात्मक जवाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या. राजकीय क्षेत्रातील महिलांसाठी त्या रोल मॉडेल होत्या. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही , असेही सुधीर मुनगंटीवार यांनी शोकभावना व्यक्त करताना म्हटले आहे.